RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ६७] शुक्रवार, जून ४, २०२१/ज्येष्ठ १४, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १४६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून २०२१

**अधिसूचना**

**खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक गौखनि-१०/०२२०/प्र.क्र.३९/ख-२.—खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम १५ ची पोट-कलमे (१) आणि (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे : —

१. या नियमांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ याच्या अखेरीस असलेल्या अनुसूची १ व अनुसूची २ ऐवजी पुढील अनुसूची दि. १ जुलै २०२१ पासून लागू करण्याकरिता समाविष्ट करण्यात येत आहे :—

**अनुसूची एक**

स्वामित्वधनाचे दर

[नियम ४६ (एक) आणि ५९ (१) पहा].

| अ.क्र. (१) | गौण खनिजे (२) | स्वामित्वधनाचे दर (३) |
|---|---|---|
| १ | बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्टयांमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना. | रुपये ६००/- प्रति ब्रास |
| २ | उत्खननाद्वारे किंवा गोळा करून काढलेले सर्व दगड मग त्याचा आकार केवढाही असो आणि दगडाची भुकटी. | रुपये ६००/- प्रति ब्रास |
| ३ | बांधकामासाठी वापरण्यात येणारा जांभा दगड (लॅटराईट स्टोन) | रुपये १५०/- प्रति ब्रास |

| | | |
|---|---|---|
| ४ | (क) उत्खननाद्वारे काढलेले किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी , मुरूम , कंकर. | रुपये ६००/-प्रति ब्रास |
| | (ख) केवळ बॉलमिल्सच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारे चॅल्सेडोनी खडे | रुपये ३०००/- प्रति ब्रास |
| | (ग) पुढील प्रयोजनाकरिता वापरण्यात न येणारी सर्वसामान्य वाळू :-<br>(एक) सिरामिक किंवा मृतिकाशिल्पे तयार करण्याच्या प्रयोजनार्थ<br>(दोन) धातुशास्त्रीय प्रयोजनार्थ<br>(तीन) दृष्टिविषयक प्रयोजनार्थ<br>(चार) कोळसा खाणीमध्ये साठवून ठेवण्याच्या प्रयोजनार्थ<br>(पाच) सिल्व्हीक्रेट सिमेंट तयार करण्यासाठी<br>(सहा) मातीची भांडी व काच सामान तयार करण्यासाठी. | (१) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राकरिता रुपये १२००/-प्रति ब्रास.<br>(२) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र वगळून इतर क्षेत्राकरिता रुपये ६००/-प्रति ब्रास. |
| ५ | कौले (मंगलोरी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनाची) तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी चिकणमाती. | रुपये ६००/- प्रति ब्रास |
| ६ | अंतर्गत बंधारे, रस्ते, लोहमार्ग व इमारती यांचे बांधकाम करताना भरणा करण्यासाठी/भूपृष्ठ सपाट करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी माती. | रुपये ६००/- प्रति ब्रास |
| ७ | बांधकामाचे साहित्य म्हणून वापरण्यात येते, त्यावेळी पाटीचा दगड किंवा नरम खडक. | रुपये ६००/- प्रति ब्रास |
| ८ | विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती, इत्यादी. | रुपये २४०/- प्रति ब्रास |
| ९ | फुलरची माती किंवा बेटोनाइट | रुपये १५००/- प्रति ब्रास |
| १० | सजावटीच्या प्रयोजनासाठी वापरावयाचे इतर सर्व प्रकारचे दगड (ग्रॅनाईट वगळून. | रुपये ३०००/- प्रति ब्रास |
| ११ | इतर सर्व गौण खनिज (ग्रॅनाईट वगळून व केंद्र शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०१५ अन्वये घोषित केलेली गौण खनिजे वगळून). | रुपये ६००/- प्रति ब्रास |

**अनुसूची दोन**

ठोकबंद भाडे

[नियम ४६ (पाच) पहा]

| | |
|---|---|
| गौण खनिजे (ग्रॅनाईट वगळून व केंद्र शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०१५ अन्वये घोषित केलेली गौण खनिजे वगळून). | रु . ९,००० प्रति हेक्टर किंवा त्याच्या भागासाठी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमेश चव्हाण,**

शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th June 2021

*NOTIFICATION*

MINES AND MINERALS (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1957.

No. gaukhni-10/0220/C.R.39/kh-2.— In exercise of the powers conferred by sub- sections *(1)* and (*3*) of section 15 of the Mines and Minerals_(Development and Regulation) Act, 1957 *(*67 of 1957*)*, and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) *(*Amendment) Rules, 2021.

2. For Schedule I and Schedule II appended to the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013, the following Schedules shall be substituted with effect from the 1st July 2021, namely :—

*SCHEDULE-I*

Rates of Royalties
*[See* rule 46 (*i*) and 59 (*1*)*]*

| Sr. No. (1) | Minor Minerals (2) | Rate of Royalty (3) |
|---|---|---|
| 1 | Limestone and lime shell used in kilns for manufacture of lime used as building material. | Rs.600 per brass |
| 2 | All Stones removed irrespective of size including stone dust either by excavation or collection. | Rs.600 per brass |
| 3 | Laterite Stone used for building purpose (Jambha Stone) | Rs 150 per brass |
| 4 | (a) Shingle, Gravel, Murum, Kankar all removed either by excavation or collection. | Rs.600 per brass |
| | (b) Chalcedony pebbles used for ball mill purposes only. | Rs.3,000 per brass |
| | (c) Ordinary sand not used for the following purposes, namely :—<br>(i) Purposes of refractory and manufacture of ceramic<br>(ii) Metallurgical purposes<br>(iii) Optical purposes<br>(iv) Purposes of stowing in coal mines<br>(v) For manufacture of silvicrete cement<br>(vi) For manufacture of pottery and glass. | (i) Rs. 1200 per brass in the area of Mumbai Metropolitan Region.<br>(ii) Rs. 600 per brass in the area other than Mumbai Metropolitan Region. |
| 5 | Ordinary clay, when used for manufacture of tiles (Mangalore pattern or any other purpose). | Rs.600 per brass |
| 6 | Ordinary earth used for filling or levelling purpose in construction of embankment, Roads, Railways and Building. | Rs.600 per brass |
| 7 | Slate and Shale when used for building material | Rs.600 per brass |
| 8 | Earth, Silt and all types of clays etc. used for manufacture of bricks and other purposes. | Rs.240 per brass |

| | | |
|---|---|---|
| 9 | Fullers earth or Bentonite | Rs. 1500 per brass |
| 10 | All stones (excluding Granite) intended for use for decorative purposes. | Rs.3000 per brass |
| 11 | All other minor minerals (excluding Granite and minor minerals declared by Central Government Notification dated 10th February 2015). | Rs.600 per brass |

*SCHEDULE-II*

Dead Rent

[*S*ee rule 46 (*v*)]

| | |
|---|---|
| All Minor Minerals (Excluding Granite and minor minerals declared by Central Government Notification dated 10th February 2015). | Rs. 9000 per hectare or portion thereof. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMESH CHAVAN,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.